# वृत्ती

कित्येक सूर्य येथे कवडश्यात आले,
झरोके क्षुब्ध धुरांचे ते त्यात अस्त झाले ।
कुठे ज्वाळा अग्नीची डाव भुकेचा मांडे,
कोरडे जीव उपाशी कित्येक स्वस्त झाले ॥

ना तक्रार कधीही आम्हीही आजवर केली,
नियम पूरक तरीही तेवढ्यात फस्त झाले ।
त्यांना कुठे मुलाहिजा, कसलीच भीड नाही,
नियम त्यांचेच त्यांना आज रास्त झाले ॥

आम्हास दिवस नवाही, घेऊन आव्हाने नवी,
जुने निमाले असो, सिद्ध हस्त झाले ।
आम्हास तिडीक पोटाची, फिकीर ना कशाची
आम्हास पुन्हा छळाया, सारेच व्यस्त झाले ॥

काहीच आर्जवे माझी, नशिबाने मान्य केली,
यश माझे हाताची, पाहून त्रस्त सारे ।
मी गटात बसलो, सारा विरोध विरला
जे जे आडवे गेले, सारेच दोस्त झाले ॥

© सपु
www.saarthbodh.com